सकाळ



औंध : माता रमाबाई आंबेडकर शाळेत लोहमार्ग पोलिस दलाच्या वतीने स्थापना दिवसानिमित्त संचलन करण्यात आले.



खडकी : वाहतूक नियमनाबाबत जनजागृतीचे फलक हाती घेऊन प्रबोधन करताना ऑल सेंट्स हायस्कूलचे विद्यार्थी व मान्यवर.

# स्थापना दिवसानिमित्त पोलिसांचे संचलन

## चिखलवाडी, खडकीत कार्यक्रमाचे आयोजन

**औंध, ता. ७ : पोलिस दलाच्या स्थापना दिवसाच्या (रायजिंग डे) निमित्ताने चिखलवाडी आणि खडकी येथे पोलिस दलाने संचलन केले. सामान्य नागरिकांची पोलिसांबद्दलची भीती नष्ट होऊन जनता व पोलिस यांच्यातील संबंध सुदृढ करण्याबरोबरच सर्वांसह विद्यार्थ्यांना पोलिसांच्या कामकाजाची माहिती व्हावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

चिखलवाडी येथील महापालिकेच्या माता रमाबाई आंबेडकर (शाळा क्रमांक ६०बी) विद्यालयात पोलिस दलाच्या वतीने संचलन करण्यात आले. लोहमार्ग पोलिस मुख्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या संचलनास दीपक साकोरे, कविता नेरकर -पवार, नरेंद्र गायकवाड हे पोलिस अधिकारी, शिक्षण विभागाचे सहायक प्रशासकीय अधिकारी शिवाजी बोखारे आदी उपस्थित होते.

सामान्य नागरिकांची पोलिसांबद्दलची भीती नष्ट होऊन जनता व पोलिस यांच्यातील संबंध सुदृढ करण्याबरोबरच सर्वांसह विद्यार्थ्यांना पोलिसांच्या कामकाजाची माहिती व्हावी, यासाठी या संचलनाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच यानिमित्ताने, पोलिसांचे प्रत्यक्ष काम कसे चालते, यासाठी पोलिस दलातील शस्त्रास्त्रे, विविध विभागाची माहिती व पोलिस दलातील श्वानांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धाही घेण्यात आली. यातील साक्षी कांबळे (प्रथम), सुश्मिता प्रजापती (द्वितीय), अक्कम्मा पुजारी (तृतीय क्रमांक) या विजेत्या स्पर्धकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. या वेळी पोलिस निरीक्षक मौला सय्यद, राखीव पोलिस निरीक्षक सोपानराव घोडे, महिला पोलिस उपनिरीक्षक मीरा कवडीकवार, मुख्याध्यापिका स्मिता फेंगसे, छाया पवार यांच्यासह सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाहतूक नियमांबाबत खडकीत जनजागृती

**खडकी बाजार** : ऑल सेंट्स हायस्कूल (खडकी) आणि खडकी वाहतूक पोलिस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र पोलिस स्थापना दिनानिमित्त वाहतूक नियमांचे पालन कसे करावे, याबाबत जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटन विभागाच्या पोलिस निरीक्षक संगीता पाटील व पोलिस कर्मचारी प्रमोद सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले.

या रॅलीमध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनींनी वाहतुकीचे पालन कसे करावे, याचे फलक हातात घेऊन चौकाचौकांत जनजागृती केली; तसेच सिग्नलवरील वाहनचालकांना वाहतुकीच्या नियमांचे महत्त्व पटवून दिले. सर्व विद्यार्थ्यांनी चौकाचौकांत नागरिकांशी संपर्क साधत जनजागृती केली. वाहनचालकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रम यशस्वी व शिस्तबद्ध केला म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका जस्सी जयसिंग, संचालक जयसिंग डी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले. कार्यक्रमाचे आयोजन क्रीडाशिक्षक सुनील साठे, अनिकेत मुधव्या, दीपा बनसोडे यांनी केले.



Scanned by CamScanner